मुंबई मित्र मुंबई
शुक्रवार, १ फेब्रुवारी २०१९

# बोल्टने केले टीम इंडियाला बोल्ड

■ वृत्तसंस्था
हॅमिल्टन

भारतीय क्रिकेट टीमचा गुरुवारी न्यूझीलंड विरुद्ध चौथ्या वनडेत पराभव झाला. न्यूझीलंडने ८ विकेटने भारतावर विजय मिळवला. या विजयासह या सिरीजमध्ये किवींनी आपलं विजयाचे खाते उघडले. सिरीजमधील आधीचे ३ सामने भारताने जिंकत सिरीज जिंकली असली तर आज भारताचा दारुण पराभव झाला. विराट कोहलीच्या अनुपस्थितीत झालेल्या या सामन्यात टीम इंडिया ९२ रनवर ऑलआऊट झाली. टॉस जिंकत आधी बॉलिंगचा निर्णय घेणाऱ्या न्यूझीलंडच्या ट्रेंट बोल्टने टीम इंडियाच्या फलंदाजांना चांगलेच धक्के दिले. यानंतर

| टीम | इतक्या बॉलने पराभव | वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|
| न्यूझीलंड | २१२ | २०१९ | हॅमिल्टन |
| श्रीलंका | २०९ | २०१० | दाम्बूला |
| श्रीलंका | १८१ | २०१२ | हंबनटोटा |
| श्रीलंका | १७६ | २०१७ | धर्मशाला |
| ऑस्ट्रेलिया | १७४ | १९८१ | सिडनी |

किवीच्या फलंदाजांनी २ विकेट गमवत ९३ रनचं टार्गेट सहज गाठलं. भारताचा हा वनडे क्रिकेट इतिहासातला सर्वात मोठा पराभव होता.

न्यूझीलंडने २१२ बॉल बाकी ठेवत भारतीय टीमचा पराभव केला. त्यामुळे हा भारतीय टीमचा सर्वात मोठा पराभव ठरला. सर्वाधिक बॉलच्या फरकाने याआधी २०१० मध्ये श्रीलंकेने भारताचा पराभव केला होता. त्या सामन्यात २०९ बॉल बाकी ठेवत श्रीलंकेने विजय मिळवला होता. २१ रन देत ५ विकेट घेणारा बोल्ट मॅन ऑफ द मॅच ठरला. टीम इंडियाच्या वनडे इतिहासातील हा दुसरी सर्वात निच्चांकी धावसंख्या आहे.

भारताकडून सर्वाधिक धावा या युजवेंद्र चहलने केल्या. त्याने नाबाद १८ धावांची खेळी केली. या खालोखाल गेल्या सामान्यात पुनरागमन केलेल्या हार्दिक पांड्याने १६ धावा केल्या. तर कुलदीप यादवने १५ धावांची कामगिरी केली.

# क्रिकेट पंच दोतीवाला यांचे निधन

■ प्रतिनिधी
मुंबई

माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच दारा दोतीवाला यांचे बुधवारी मुंबईत निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात १९८६ साली बरोबरीत सुटलेल्या प्रसिद्ध कसोटी सामन्यात ते पंच म्हणून राहिले होते.

३० ऑक्टोबर १९३३मध्ये जन्मलेल्या दोतीवाला यांनी १९८२ ते १९८७ दरम्यान सहा सामन्यांत पंच म्हणून काम पाहिले. आपल्या राहत्या घरीच त्यांचे निधन झाल्याची माहिती त्यांचे जावई आदि मिस्त्री यांनी दिली.

भारत आणि श्रीलंका यांच्यात १९८२मध्ये बेंगळुरू येथे झालेली वनडे ही त्यांच्या कारकीर्दीतील पहिली वनडे होती. गुरुवारी सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. खेळायचे होते .तेथे खेळायला मिळाल्याने आम्हाला अन्य करणे देता येणार नाहीत.

**DHANLAXMI COTEX LIMITED**
CIN: L51100MH1987PLC042280
Regd. Off: 285, Chatrabhuj Jivandas House, 2nd Floor, Princess Street, Mumbai - 400002
Tel No: 022-66228050 | Email Id: dcotex1987@gmail.com | Website: www.dcl.net.in
**NOTICE**
Notice is hereby given that pursuant to Regulation 29 (1) (a) read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation 2015, the Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on **Monday, 11th February, 2019 at 11:00 a.m.**, inter-alia to consider, review and adopt quarterly Unaudited Standalone Financial Results for the Quarter & Nine Months ended **31st December, 2018** along with Limited Review Report thereon and other Businesses.
This information is available on the website of the Company at www.dcl.net.in
For Dhanlaxmi Cotex Limited
Sd/-
Date: 01-02-2019 Ramautar Jhawar
Place: Mumbai (Managing Director)

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (परसेवा) यांचे कार्यालय**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ, वडाळा, मुंबई-४०० ०३१.
**जाहीर नोटीस**
जनसेवा सहकारी बँक (बोरीवली) लि. ... अर्जदार
गिरीराज अपार्टमेंट,
डी. जी. पालकर मार्ग,
बोरीवली (प), मुंबई - ४०० ०९२.
अनुक्रमांक १ ... जाब देणार
खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करणेसी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला

**ACI INFOCOM LIMITED**
130, 1st Floor, V. Mall, Thakur Complex, Kandivali East Mumbai 400 101
Email: compliance@acirealty.co.in
Web: www.acirealty.co.in
**NOTICE**
Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligation and Disclosure